मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » मंगळवार, दि. 2 जुलै 2024 | पान- 1

# महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घ्या

## साहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांचे आवाहन : लाभार्थ्यांना 30 सप्टेंबरपर्यंत संकेतस्थळावर करावा लागणार अर्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

शालेय आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने विविध योजना राबवण्यात येतात. विविध मागासवर्गीय कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन साहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी केले आहे.




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाच्या वतीने महिला व बालकल्याण योजना, दिव्यांग व कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना तसेच इतर कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. त्यापैकी मागासवर्गीय कल्याणकारी योजनेमध्ये माता रमाई आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महर्षी वाल्मिकी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या योजनांचा समावेश आहे. माता रमाई आंबेडकर योजनेअंतर्गत इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गात शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यानुसार इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ४ हजार रुपये तर ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये देण्यात येणार आहेत.

महर्षी वाल्मिकी योजनेअंतर्गत इयत्ता ८ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींना सायकल घेण्यासाठी एकदाच ७ हजार रुपये अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेअंतर्गत परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी मागासवर्गीय युवक-युवतींना प्रथम वर्षासाठी एकदाच १ लाख ५० हजार रुपये अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त मागासवर्गीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी संगणक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. संगणक प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थीस प्रशिक्षण फी मध्ये ९० टक्के सवलत देण्यात येणार असून यासोबतच महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण (आयटीआय) मार्फत एम.के.सी.एल अंतर्गत एमएस-सीआयटी, डी.टी.पी, टॅली आणि के.एल.आय.सी. या संगणक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

या सर्व योजनांची सविस्तर माहिती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN अधिकृत संकेतस्थळावरील समाज विकास विभाग या पर्यायावर उपलब्ध असून अर्ज करण्यासाठी लागणारी कागदपत्रे, अटी शर्ती, लाभाच्या स्वरूपाची माहिती ही संकेतस्थळावर देण्यात आली आहे. तरी शहरातील जास्तीत जास्त लाभार्थींनी दिलेल्या मुदतीत वेळेत अर्ज करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### उच्च शिक्षणास मिळणार अर्थसाहाय्य

» पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर योजनेअंतर्गत १२ वी नंतरचे वैद्यकीय अभ्यासक्रम (एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस, बीयूएमएस, बीएचएमएस), अभियांत्रिकी पदवी बी.आर्क, बी.पी.टी.एच, बी.फार्म, बी.व्ही.एस.सी, आभियांत्रिकी ए.एन.एम, जी.एन.एम आणि बी.एस्सी नर्सिंग पदवीसारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षी एकदाच २५ हजार रुपये अर्थसाहाय्य दिले जाणार आहे.

# भाजपाचे अमित गोरखे यांना विधान परिषदेवर संधी!

## पंकजा मुंडेंचं राजकीय पुनर्वसन : विधान परिषदेसाठी भाजपची 5 नावं जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभेतून विधानपरिषदेवर भाजपच्या कोट्यातून पाठविण्यासाठी पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी यासंदर्भात उमेदवारी जाहीर केली आहे. अमित गोरखे यांच्यासह माजी मंत्री पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, सदाभाऊ खोत यांचीही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



जुलै महिन्यात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. २ जुलै उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

अमित गोरखे यांना संधी मिळाल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद वाढणार असून पक्षाला आगामी निवडणुकीत फायदा होणार आहे. विधानसभेचे दोन आणि विधानपरिषदेचे दोन असे भाजपचे चार आमदार गोरखे यांच्या रूपाने होणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू अशी गोरखे यांची ओळख आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे आता त्यांना मंत्रिपद मिळणार का? यावर चर्चा सुरु झाली आहे. आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेता पंकजा मुंडे सारखा ओबीसी चेहरा राज्यात भाजपसाठी लाभदायक ठरणार आहे. त्यामुळे आता होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात पंकजा मुंडे यांना मंत्रिपदाची संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गिरीष महाजन यांच्या हस्ते निर्मल दिंडीचा शुभारंभ

## स्वच्छ, निर्मल वारीसाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा : ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो भाविक येत असल्याने वारी स्वच्छ, निर्मल व सुरक्षित व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असून निर्मल वारीसाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी केले.



विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित निर्मल दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, विभागीय उपायुक्त वर्षा लड्डा, विजय मुळीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आदी उपस्थित होते.

मंत्री गिरीष महाजन म्हणाले, महाराष्ट्र ही साधुसंतांची भूमी आहे. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी धार्मिक विचारांसोबत स्वच्छतेचा आणि सामाजिक संदेशही दिला. निर्मल वारीच्या निमित्ताने हाच संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

आषाढी वारीसाठी राज्यभरातून पालखी सोहळ्यांचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. शासनाने वारकऱ्यांच्या व्यवस्थेसाठी पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. निर्मल वारीसाठी मागील वर्षीपेक्षा अधिक निधी उपलब्ध करुन दिला आहे. पालखी मार्गावरील गावांना त्रास होऊ नये, रोगराई पसरू नये यासाठी शासन योग्य ती काळजी घेत असून निर्मल वारीसाठी जिल्ह्यातील स्वयंसेवक, सेवाभावी संस्था, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर व त्र्यंबकेश्वरसह राज्यातील पाच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भक्तांना सर्व सुविधा उपलब्ध होण्यासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे. राज्यातील ४९७ 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी आवश्यक सुविधांसाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, वारीच्या माध्यमातून सर्वात मोठा सांस्कृतिक सोहळा दरवर्षी पहायला मिळतो. राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविक आषाढी वारीसाठी येत असतात. संपूर्ण सोहळा स्वच्छ, निर्मल व सुरक्षित व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याकरिता पुरेसा निधीही उपलब्ध करुन दिला आहे. विविध संतांनी समाजप्रबोधन करताना धार्मिक कार्याला सामाजिक कार्याची जोड कशी द्यावी याबाबत संदेश दिला. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामुहिक स्वच्छतेबाबत संदेश दिला. मंदिर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवा, कचरा अस्ताव्यस्त फेकू नका, प्लास्टिकचा वापर टाळा, नदी प्रदूषण टाळा असे सांगून स्वच्छ, निर्मल वारीसाठी स्वच्छतेच्या सुविधांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील म्हणाले, महाराष्ट्राचा मानबिंदू असलेली आषाढी वारी महाराष्ट्राचे वैभव म्हणून ओळखली जाते. संतांनी समाजाची मने निर्मल केली. त्यांच्या कार्याच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व समाजाला सांगितले. संतांचा संदेश समोर ठेवून निर्मल वारीची सुरूवात करण्यात आली आहे. निर्मल वारीसाठी मागील वर्षीपेक्षा भौतिक सुविधा वाढविण्यात आल्या आहेत. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्तव्याला सामाजिक जबाबदारीची जोड देत निर्मलवारी यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

### पालखी मार्गावर वृक्षलागवडीचा संकल्प करावा - गिरीष महाजन

» संतांनी भजन, कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचा, सामाजिक समतेचा संदेश दिला. पालखी मुक्काम व विसावा गावातून प्रस्थान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी गाव व परिसराची स्वच्छता करण्याची खबरदारी घ्या. स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीचा संदेश दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वांनी पालखी मार्गावर वृक्षलागवडीचा संकल्प करावा, असे आवाहनही गिरीष महाजन यांनी केले.

# 'स्वच्छ'च्या सेवकांवर आता पालिकेचे नियंत्रण!

## पालिकेचे आरोग्य निरीक्षक ठेवणार 'स्वच्छ' सेवकांवर नियंत्रण : नागरिकांच्या तक्रारी सुटण्यास होणार मदत

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करण्यासाठी स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेसोबत महापालिकेने पाच वर्षांसाठी करार केला आहे. स्वच्छ संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर महापालिकेचे कोणतेही नियंत्रण नव्हते. त्यामुळे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना काम करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. आता मात्र संस्थेसोबत पाच वर्षांचा करारनामा करताना पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आरोग्य निरीक्षकांना संस्थेच्या सेवकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे आता समन्वय राखून योग्यप्रकारे काम करता येणार असून नागरिकांच्या समस्या सुटण्यासही मदत होणार आहे.



स्वच्छ संस्थेकडून शहरातील विविध भागात कचरा संकलनाचे काम केले जाते. अनेक ठिकाणी कचरा उचलला जात नसल्याच्या तक्रारी पालिकेकडे येतात. मात्र त्या सोडविण्यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना सूचना कोण देणार, असा प्रश्न होता. संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून पालिकेच्या अधिकाऱ्यांना अनेकदा दाद दिली जात नव्हती. त्यामुळे तक्रारी सोडविण्यात अडचणी येत होत्या. तसेच संस्थेवर महापालिकेचे कोणतेच नियंत्रण नव्हते. आता नव्याने करण्यात आलेल्या करारनाम्यात नियंत्रण ठेवता येणार आहे.

स्वच्छ संस्थेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे अपेक्षित आहे. कचऱ्याचे वर्गीकरण करून तो कचरा रस्त्यावर न फेकता संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडेच द्यावा अशी जनजागृती करणे अपेक्षित आहे. स्वच्छ संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवले जाणार असल्याने सुसूत्रता राखली जाणार असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता आरोग्य निरीक्षकांकडून नियंत्रण ठेवले जाऊन शहर स्वच्छ ठेवण्यासाठी शंभर टक्के काम केले जाणार आहे.

### करारनाम्यातील अटी

१) स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांच्या चुकीमुळे क्रॉनिक स्पॉट आढळल्यास संबंधित कचार वेचकाला जबाबदार धरून ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. तसेच हा प्रकार सलग तीन वेळा घडल्यास साहाय्यक आयुक्तांकडून अहवाल मागवून स्वच्छ संस्थेकडून त्या भागातील कचरा संकलनाचे काम काढून घेण्यात येणार असून दुसऱ्या संस्थेला काम दिले जाणार आहे.

२) दैनंदिन कचरा संकलनाचे व्यवस्थापन करणे, नव्याने समाविष्ट भागात कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करणे या सोबतच इतर कामे करण्यासाठी १४४ प्रभागात एकूण १८० समन्वयक नेमले जाणार आहेत. या समन्वयकांचा पगार पालिका देणार आहे. त्यामुळे समन्वयक नेमताना कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा, एमएसडब्ल्यू, पदविका किंवा स्वच्छ सर्वेक्षणबाबत योग्य शैक्षणिक पात्रता ठरविण्याचे अधिकार पालिकेच्या आयुक्तांना असणार आहेत.

### 'स्वच्छ' वर 8 कोटींहून अधिक खर्च

» शहरातील कचरा संकलनाचे काम स्वच्छ संस्थेला देण्यात आले आहे. विविध भागातील कचरा उचलला जात नसल्याच्या तक्रारी पालिकेकडे येतात. त्यामुळे आता स्वच्छ संस्थेच्या सेवकांवर समन्वय राखण्यासाठी १८० समन्वयक नेमले जाणार आहेत. या समन्वयकांना पालिकेकडून प्रतिमहिना २२ ते २५ हजार रुपये पगार दिला जाणार आहे. हा खर्च धरून पालिका स्वच्छ संस्थेवर ८ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करेल. त्यामुळेच पालिकेचे या संस्थेवर नियंत्रण असावे असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्या प्रस्तावाला पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी मान्यता दिली आहे.

# खासगी शाळांची शासन आदेशाला केराची टोपली

## पूर्वप्राथमिक व प्राथमिकचे वर्ग सकाळी नऊ किंवा नऊ नंतर भरवण्याचे आदेश डावलले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील 80 टक्के शाळा सकाळच्या सत्रात भरवल्या जातात. अनेक भागात लहान मुलांच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळादेखील सकाळी सातच्या आसपास भरतात. त्यामुळे मुलांचे डब्बे बनवण्यासाठी पालकांना पहाटे लवकर उठून धावपळ करावी लागते. तसेच मुलांना पहाटे सहा वाजल्यापासून उठून दप्तराची आवरा-आवर करावी लागते. या धावपळीत मुलांची झोप पूर्ण होत नाहीच. शिवाय पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

बदललेल्या जीवनशैलीमुळे मुलांची झोप पूर्ण होत नाही, त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षात पूर्व प्राथमिक ते चौथीचे वर्ग सकाळी नऊनंतर भरवावेत, असे आदेश शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिले. त्यानुसार, महापालिकेच्या शिक्षण विभागाने सर्व खासगी व महापालिकेच्या शाळांना पत्र दिले. मात्र, त्यानंतरही पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी शाळा नेहमीच्या सकाळी सात वाजता सुरू असल्याने त्यांनी शासन आदेशालाच केराची टोपली दाखवल्याचे(PCMC) समोर आले आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते इयत्ता 4 थी पर्यंतचे वर्ग सकाळी 9 किंवा 9 नंतर भरवण्याबाबत 8 फेब्रुवारी 2024 रोजी परिपत्रक काढले होते. शासनाच्या संकेतस्थळावर ते प्रसिद्ध केले तसेच त्याची प्रत शिक्षण आयुक्त यांच्यासह शिक्षण संचालक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्या कार्यालयापर्यंत पोहचली. असे असतानाही नवीन शैक्षणिक वर्षात शाळा पूर्वीच्या सकाळी 7 च्या वेळेतच(PCMC) भरत आहेत.

शाळेच्या वेळेसंदर्भात आता महापालिका शिक्षण विभागाने खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठवले आहे. ज्या शाळा व्यवस्थापनाला शाळेची वेळ बदलणे अगदी शक्य नाही, अशी अडचण शिक्षण विभागाकडे सांगितल्यास त्यावर मार्गदर्शन करून योग्य निर्णय घेता येईल असे शासन आदेशात म्हटले आहे. महापालिकेच्या जवळपास 45 शाळांची वेळ बदलण्याचे काम सुरू झाले असून बाकी शाळांचे सत्र बदलण्यात आले आहे. शासन आदेशाचे पालन करण्यासंदर्भात पुन्हा खासगी शाळांना पत्र काढले जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिली.



### शिक्षण विभागाकडून शाळांना खरमरीत पत्र

» महापालिका शिक्षण विभागाकडून सन २०२४-२०२५ पासून पूर्वप्राथमिक ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग भरवण्याची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवण्याचे सूचित केले आहे. दरम्यान, काही शाळांनी इयत्ती चौथीपर्यंतचे वर्ग ९ किंवा ९ नंतर भरणे शक्य होत नाही, अशाप्रकारे शिक्षण विभागाकडे कळवले आहे. त्यानुसार ज्या शाळांनी दोन सत्रांमध्ये शाळा भरवण्यासाठी कार्यालयाची परवानगी घेतलेली आहे. त्यांनी इयत्ता ५ वी किंवा इयत्ता ६ वी पासूनचे वर्ग सकाळच्या सत्रात व पूर्वप्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग दुपारच्या सत्रात भरवावेत. या अध्यापनाचा निश्चित केलेला कालावधी कमी होणार नाही, याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापनाने घ्यावी. शासन आदेशाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचा इशारा

» सकाळी 9 वाजता शाळा सुरू करण्याचा आदेश सरकारचा होता. मात्र शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्या दिवसापासूनच शाळांनी सरकारच्या यानिर्णयाला केराची टोपली दाखवली. ही बाब निदर्शनास आल्यानंतर शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर हे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. शाळांनी जर सुचनांची अमंलबजावणी केली नाही तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे. शाळांना सकाळा शाळा सुरू करण्यात काय अडचण आहे हे तरी त्यांनी आम्हाला सांगावे असेही ते म्हणाले. सरकारला शाळा आणि शिक्षण संस्थांनी गृहीत धरू नये असेही त्यांनी स्पष्ट केले.

“ शहरात महापालिकेसह सर्व माध्यमांच्या खासगी शाळांची वेळ सकाळी ७ ते ८.३० वाजेपर्यंत भरवल्या जातात. तब्बल ८० टक्के शाळांची वेळ सकाळची आहे. त्यामुळे सकाळच्या वेळेत बदलण्यासाठी सर्व शाळांना पत्राद्वारे कळवले आहे. २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षापासून पूर्वप्राथमिक, प्राथमिकच्या चौथीपर्यंतच्या शाळा सकाळच्या सत्रात भरण्यात याव्यात. याकरिता सर्व खासगी शाळांचे व्यवस्थापक आणि शिक्षण विभागाकडून समन्वय साधून निर्णय घेण्यास पाठपुरावा सुरू आहे. महापालिकेसह सर्व माध्यमांच्या खासगी शाळांच्या वेळेत देखील बदलण्यात येत आहे.

- संगीता बांगर,प्रशासन अधिकारी, महापालिका शिक्षण विभाग

# पीएमआरडीए कार्यालयाची विस्कटलेली घडी बसवणार

## नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार, नूतन आयुक्त योगेश म्हसे यांनी व्यक्त केला विश्वास

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीएची सध्या विस्कटलेली घडी बसवण्यात येणार असून, प्राधिकरणातील प्रलंबित विशेषतः नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार असल्याचे पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे यांनी सांगितले. पदभार स्वीकारल्यानंतर प्राधिकरणाचा आढावा घेतला. एकूण मनुष्यबळ, प्राधिकरणातील प्रकल्प, रखडलेले प्रश्न या सर्वांची माहिती मागवण्यात आलेली आहे.

प्राधिकरणाच्या आयुक्तपदी शुक्रवारी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी लागलीच बजेटपासून ते उपलब्ध मनुष्यबळापर्यंत सर्वच माहिती मागवली आहे. पूर्वीचे प्राधिकरण म्हणजेच पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण याचे विलीनीकरण झाल्यानंतर पीएमआरडीएच्या कामकाजामध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे नवी जबाबदारी असल्याचे सांगून म्हसे म्हणाले की, माझ्या कामाची पद्धत जरा वेगळी आहे. त्यामुळे प्राधिकरणाची प्रलंबित कामे मार्गी लावण्यात येणार आहेत.



### प्राधिकरणाला मिळणार जनसंपर्क अधिकारी

» प्राधिकरणातील प्रकल्प आणि एकूणच नागरिकांना आवश्यक असणारी माहिती पोहोचत नाही. त्यामुळे प्राधिकरणात काय काम चालू आहे, हे अनेकांना समजून येत नाही. त्यासाठी प्राधिकरणाची माहिती प्रसारमाध्यमापर्यंत पोहोचवण्यासाठी जनसंपर्क अधिकारी नेमण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे प्राधिकरणाचे कामकाजाची गती वाढवण्यात येईल. विशेष म्हणजे केंद्राकडे आणि राज्य शासनाकडे काही प्रकल्प प्रलंबित असल्याने ते सुद्धा सोडवण्याबाबत प्रयत्न करणार आहे. मेट्रो, गृहप्रकल्प याचीही माहिती घेण्यात येणार असून, त्यातीलही काही त्रुटी असल्यास त्या सोडवण्यात येतील.

दरम्यान, आयुक्तांनी प्राधिकरणाचे बजेट आणि सध्या सुरू असणाऱ्या प्रकल्पांची माहिती संबंधित अधिकाऱ्याकडून घेतली. आता प्राधिकरणात जुने-जाणते अधिकारी अगदी बोटाच्या मोजण्याइतपत आहेत. ज्यांना प्राधिकरणाची सर्व माहिती आहे. त्याचप्रमाणे त्यांना माझ्या कामाची देखील माहिती असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यामुळे येत्या काही दिवसात प्राधिकरणात बदल दिसून येईल. प्रत्येक अधिकारी आपले काम चोखपणे पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

# भगिनींनो तातडीने गोळा करा कागदपत्रे!

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'योजनेसाठी सुरु झाल्या हालचाली

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी इंदापूर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील भगिनींना तातडीने कागदपत्रे गोळा करण्याची गरज आहे.

सोमवार १ जुलैपासून अर्ज भरण्यास प्रारंभ होत असून,अर्ज भरण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२४ ही आहे. मुदत संपल्यानंतर या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची पाळी येऊ शकते असे बोलल्या जात आहे. त्यामुळे तालुक्यातील भगिनींनी गोळा करा कागदपत्रे, असा नारा गावागावातून दिला जात आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही,१ जुलैपासून अर्ज भरण्यास होणार प्रारंभ, १४ ऑगस्टला जमा होणार खात्यात पैसे माझी लाडकी बहीण योजना, महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा १,५०० रूपये इतकी रक्कम दिली जाईल. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंतच्या महिलांना लाभ मिळेल.

सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे असे शासन परिपत्रकात नमूद केलेले आहे.

योजनेसाठी नोंदणीच्या पहिल्याच दिवशी राज्यातील अनेक सेतू केंद्र आणि तहसील कार्यालयांमध्ये नोंदणीसाठी महिलांनी मोठी गर्दी केली. योजनेत नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्र जमा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सेतू केंद्रांवर महिला आल्या होत्या.

या योजनेत महिलांची नोंदणी झाल्यानंतर लाभार्थी महिलांची यादी जारी केली जाणार आहे. आज पहिल्याच दिवशी नोंदणी केंद्रांवर महिलांनी मोठ्या उत्साहात नोंदणी केली. या योजनेतर्गत लाभार्थी महिलांना प्रति महिना 1500 रूपये मिळणार आहेत.



### " या कागदपत्रांची गरज "

» उत्पन्नाचा दाखला सन २०२५ पर्यंत वैध असणारा असावा,जन्माचा दाखला,टि. सी झेरॉक्स,डोमेसाईल प्रमाणपत्र,रेशन कार्डची झेरॉक्स,आधार कार्ड,लाभार्थी नावाने बँक पासबुक झेरॉक्स. तसेच केंद्र,राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे १,५०० रूपये पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल. राज्यातील २१ ते६० यावर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित,परित्यक्तया आणि निराधार महिला या योजनेसाठी पात्र राहतील.

### "असे आहे योजना अंमलबजावणीचे वेळापत्रक "

» अर्ज प्राप्त करण्यास सुरुवात १ जुलै, २०२४,अर्ज प्राप्त करण्याचा शेवटचा दिनांक- १५ जुलै, २०२४, तात्पुरती यादी प्रकाशन दिनांक १६ जुलै,२०२४, तात्पुरत्या यादीवरील तक्रार / हरकती प्राप्त करण्याचा कालावधी- १६ जुलै, २०२४ ते २० जुलै, २०२४, तक्रार/ हरकतींचे निराकरण करण्याचा कालावधी- २१ जुलै, २०२४ ते ३० जुलै, २०२४, अंतिम यादी प्रकाशन दिनांक- ०१ ऑगस्ट, २०२४, लाभार्थ्यांचे बँकेमध्ये इ-केवायसी करणे- १० ऑगस्ट, २०२४, लाभार्थी निधी हस्तांतरण- १४ ऑगस्ट, २०२४, त्यानंतरच्या महिन्यांत देय दिनांक- प्रत्येक महिनाच्या १५ तारखेपर्यंत.

### अपात्र कोण असेल?

» 2.50 लाख पेक्षा जास्त उत्पन्न असणारे
» घरात कोणी Tax भरत असेल तर
» कुटुंबातील कोणी सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतन घेत असेल तर
» कुटुंबात 5 एकर पेक्षा जास्त जमीन असेल तर
» कुटुंबातील सदस्यांकडे 4 चाकी वाहन असेल तर ( ट्रॅक्टर सोडून )

---

# ग्रामविकास अधिकाऱ्यास बायोमेट्रिक सक्तीची करा

## ग्रामसेवक , ग्रामविकास अधिकारी आपल्याला दिलेल्या वेळात हजर राहत नसल्याने ग्रामस्थांची ग्रामपंचायतीमधील कामे प्रलंबित राहतात

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये सरपंचाप्रमाणे ग्रामसेवक हे पदही महत्त्वाचे असुन ग्रामसेवक ,ग्रामविकास अधिकारी आपल्याला दिलेल्या वेळात हजर राहत नसल्याने ग्रामस्थांची ग्रामपंचायतीमधील कामे प्रलंबित राहतात.

ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक बऱ्याच वेळा ग्रामपंचायत कार्यालयात भेटत नाही गावात येत नाही यासह अन्य कारणांची ओरड असते. यामुळे प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये बायोमेट्रिकची हजेरी सक्तीची करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भीमसेन उबाळे यांनी केली आहे.

तालुक्यात गावागावांमधील ग्रामस्थांची कामे वेळेवर होत नाही.याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना व मजुर वर्गाला बसतो. ग्रामसेवकासह ग्रामविकास अधिकारी, (तलाठी, कृषी सहायक, आरोग्य खात्यातील कर्मचारी,

पशुवैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी) वेळेत कधीच उपस्थित नसल्याचे याबाबत काही सामाजिक कार्यकर्ते, संघटना यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन ग्रामसेवक, तलाठी यांच्यासाठी बायोमेट्रीक हजेरी सक्तीची करावी, अशी मागणी केली यापूर्वी होती.

त्यानंतर शासनाने याबाबत निर्णय घेत कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्या आदेशाप्रमाणे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू झाल्याने कामचुकारपणा करणाऱ्या ग्रामसेवकांना चांगलाच चाप बसणार आहे.

याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. ग्रामसेवकासह ग्रामविकास अधिकारी, तलाठी, कृषी सहायक, आरोग्य खात्यातील कर्मचारी, पशुवैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी वेळेत कधीच उपस्थित नसल्याचे याबाबत काही सामाजिक कार्यकर्ते, संघटना यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन ग्रामसेवक, तलाठी यांच्यासाठी बायोमेट्रीक हजेरी सक्तीची करावी,

याबाबत ग्रामविकास विभागाने तसे आदेश जिल्हा परिषद स्तरावर दिले आहेत. त्या आदेशाची अंमलबजावणी आपल्या कार्यक्षेत्रातील इंदापूर तालुक्यामधील प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये तंतोतंत व्हावी व इंदापूर तालुक्यातील ग्रामस्थांना योग्य तो न्याय आपल्या आदेशाने मिळावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता भिमसेन उबाळे यांनी पत्राद्वारे इंदापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचेकडे केली आहे .




### ग्रामविकासाला फायदा...

» बायोमेट्रीक हजेरी सक्तीची केल्यास ग्रामविकासाला होणार हे फायदे ही त्यांनी यामध्ये नमूद केलेले आहेत. बायोमेट्रीक हजेरी सक्तीची केल्यास ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांना गावात येणे सक्तीचे राहणार आहे. हजेरीसाठी गावात आल्यावर, ग्रामपंचायतींत उपस्थिती वाढणार. पर्यायाने ग्रामस्थांची कामे वेगाने होणार असून या सह अन्य फायदे तालुक्यातील ग्रामस्थांना बायोमॅट्रिकमुळे होणार आहेत.